बुधवार दि.२६ फेब्रुवारी २०२५

हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
-ॲड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक लोकनेता बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे




RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक :१६४ किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in

# परळीत पशुवैद्यक पदवी महाविद्यालय स्थापन करण्यास मंजुरी; देवेंद्र फडणवीस सरकारचे सात मोठे निर्णय

## आधारसामग्री डाटा धोरणास राज्य सरकारची मान्यता

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

महाराष्ट्र राज्य आधारसामग्री डाटा धोरणास राज्य सरकारने मान्यता दिली आहे. त्यासाठी राज्य डाटा प्राधिकरणाची स्थापना करण्यात येणार असून मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली नियामक समिती स्थापन करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत या निर्णयाला मान्यता देण्यात आली. याबरोबरच बीड जिल्ह्यातील परळी येथे नवीन पशुवैद्यकीय पदवी महाविद्यालय स्थापन करण्यास देखील मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे.याच बरोबर १९७६ पूर्वीच्या पाटबंधारे प्रकल्पाने बाधित पुनर्वसित गावठाणांमध्ये नागरी सुविधा पुरवण्यासाठी प्रलंबित कामांचा कृती कार्यक्रम राबवण्याचा निर्णय; अशा ३३२ गावठाण साठी ५९९.७५ कोटी रुपयांच्या तरतुदीस राज्य सरकारच्या वतीने मंत्रिमंडळाच्या वतीने मंजूरी देण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत विविध महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. मंत्रालयातील मंत्रिमंडळ सभागृहात झालेल्या या मंत्रिमंडळ बैठकीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह मंत्रिमंडळातील सदस्य उपस्थित होते.

**मंत्रिमंडळ निर्णय असे**–पौड, ता. मुळशी, जिल्हा पुणे येथे लिंक कोर्टऐवजी दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग या न्यायालयाची स्थापना करण्यास मान्यता. (विधी व न्याय विभाग),ठाणे जनता सहकारी बँकेत सार्वजनिक उपक्रम, महामंडळे यांना खाते उघडण्यासाठी परवानगी (वित्त विभाग),१९७६ पूर्वीच्या पाटबंधारे प्रकल्पाने बाधित पुनर्वसित गावठाणांमध्ये नागरी सुविधा पुरवण्यासाठी प्रलंबित कामांचा कृती कार्यक्रम राबविण्याचा निर्णय; अशा ३३२ गावठाणासाठी ५९९.७५ कोटी रुपयांच्या तरतुदीस मंजूरी (मदत व पुनर्वसन विभाग),महाराष्ट्र राज्य आधारसामग्री (डेटा) धोरणास मान्यता; राज्य डेटा प्राधिकरण स्थापन करणार. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली नियामक समिती. (नियोजन विभाग),बारामती जिल्हा पुणे येथे नवीन पशुवैद्यक पदवी महाविद्यालय स्थापन करण्यास मंजुरी. यासाठी ५६४.५८ कोटी रुपयांच्या तरतूदीस मंजूरी (कृषि व पदुम विभाग),परळी, जिल्हा बीड येथे नवीन पशुवैद्यक पदवी महाविद्यालय स्थापन करण्यास मंजुरी. यासाठी ५६४.५८ कोटी रुपयांच्या तरतूदीस मंजूरी (कृषि व पदुम विभाग),महाराष्ट्र महामार्ग अधिनियम कलम १८(३) १९५५ मध्ये सुधारणा, तसेच महाराष्ट्र महामार्ग अध्यादेश २०२५ ला मान्यता (सार्वजनिक बांधकाम विभाग)



### दुर्गम भागातील कन्येची यशस्वी गरुड झेप!

# वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी फिलिपिन्स देशात वैद्यकीय शिक्षण पूर्ण

## गावात एमबीबीएस डॉक्टर होण्याचा पहिला बहुमान ही मिळवला

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**औंढा नागनाथ । प्रतिनिधी**

तालुक्यातील गोजेगाव सारख्या दुर्गम, डोंगराळ भागातील एका कन्येने आपल्या दुर्दम्य इच्छाशक्तीच्या बळावर यशस्वी गरुडझेप घेतली आहे. २०१९ साली केवळ १० गुणांवरून चइइड ला प्रवेश न झाल्यामुळे वडिलांच्या प्रेरणेने आणि स्वतःच्या दुर्दम्य इच्छाशक्तीच्या जोरावर गोजेगावसारख्या डोंगराळ, ग्रामीण भागातून परदेशी शिक्षण घेऊन आपली चइइड ची डिग्री पूर्ण करून ग्रामीण आणि शहरी भागातील पालक, तरुण विद्यार्थ्यांसमोर आदर्श निर्माण केला आहे. फिलिपिन्स देशात शिक्षण घेताना डॉ.वैष्णवीने कोरोना सारख्या खडतर काळात सतत दोन वर्षे आई–



वडिलांची भेट झाली नाही तरीही आपले शिक्षण अखंड सुरू ठेवत यशाला गवसणी घातली. त्यानिमित्ताने गोजेगावची भूमीकन्या कु.डॉ.वैष्णवीचा समस्त गोजेगावकर मंडळींच्या वतीने सामूहिक सत्कार करण्यात आला. डॉ.वैष्णवीचा सत्कार आहे असे कळताच औंढा नागनाथ पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री गणपत राहिरे यांनी आपल्या पोलीस स्टेशनच्या कर्मचाऱ्यांसह गोजेगावात दाखल होत हनुमान मंदिरासमोर पुष्पहार, शाल, पेढा भरवून सत्कार केला या वेळी वैद्यकीय शिक्षण पूर्ण करणाऱ्या वैष्णवी जायभाये या विद्यार्थिनीबद्दल गौरवोद्गार काढताना पोलीस निरीक्षक गणपत राहिरे म्हणाले, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी मोबाईल, सोशल मीडियाचा नाद सोडून यशाला गवसणी घालण्याचे आवाहन केले. यावेळी डॉ.वैष्णवीचे पालक प्रा.डॉ.विठ्ठल जायभाये व सौ.विमल जायभाये यांचा देखील सन्मान करण्यात आला. याप्रसंगी पंडितराव सांगळे, औंढा नागनाथ पंचायत समितीचे माजी सभापती श्री राजेंद्र सांगळे, सरपंच सौ. वर्षा अच्युत नागरे, उत्तमराव नागरे, शेषराव सांगळे, ज्ञानदेव जायभाये, नामदेव जायभाये, पांडुरंग सांगळे, आकाश जायभाये, बाळू सांगळे, तुकाराम कागणे, बाळासाहेब जायभाये, पंढरीनाथ जायभाये, यांच्यासह गावातील असंख्य मंडळी उपस्थित होती.

# माणिकराव कोकाटेंसह सात मंत्र्यांच्या ओएसडीची नेमणूक

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

राज्यातील मंत्र्यांचे पीएस आणि ओएसडी नेमणुकीवरून राष्ट्रवादीचे मंत्री माणिकराव कोकाटे यांनी केलेल्या विधानावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सडेतोड उत्तर दिले होते. त्यानंतर याची राजकीय वर्तुळात चर्चा रंगली होती. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर ओएसडी खाजगी सचिव नियुक्तीचे आरोप झाल्यानंतर तातडीने आज अनेक मंत्र्यांचे ओएसडी खाजगी सचिवांची नियुक्ती जाहीर करण्यात आली आहे.




# ऐतिहासिक चांदणी तलावाची भिंत तोडणाऱ्यावर कारवाई करा; अशोक राजे जाधव यांची मागणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**

मातृतीर्थ सिंदखेड राजा शहरात अनेक ऐतिहासिक वास्तू आहेत. या शहरात असलेला ऐतिहासिक वारसा चांदणी तलाव आहे. या तलावाची भिंत काही अज्ञात लोकांनी तोडली असून. त्यामुळे या तलावाच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे.

या तलावाची भिंत १५ ते २० मीटर लांब आणि १ ते १.५ मीटर उंच भिंत तोडली असून. त्यामुळे या ऐतिहासिक तलावाचे अस्तित्व धोक्यात आले आहे. पुरातत्व विभागाच्या नियमानुसार, चांदणी तलावापासून १०० मीटर अंतरावर कोणत्याही प्रकारचे बांधकाम करण्यास परवानगी नाही.तरी असे असताना देखील नियमांचे उल्लंघन करून तलावाची भिंत तोडण्यात आली आहे.या घटनेची माहिती बुलढाणा छावा संघटनेला मिळताच, संघटनेचे जिल्हाध्यक्ष अशोक राजे जाधव यांच्या नेतृत्वाखाली तात्काळ उपविभागीय अधिकारी सिंदखेड



राजा यांच्या मार्फत भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभाग,नागपूर सेमिनरी हिल, नागपूर यांना निवेदन देण्यात आले असून. निवेदना मध्ये दोषींवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.या निवेदनात, तलावाची भिंत तोडल्याने तलावाचे सौंदर्य नष्ट झाले असल्याचे, तसेच ऐतिहासिक वारसा धोक्यात आल्याचे म्हटले आहे. दोषींवर तातडीने कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा छावा संघटनेच्या वतीने निवेदनात देण्यात आला आहे. या निवेदनाची प्रत पंतप्रधान कार्यालय, मुख्यमंत्री कार्यालय, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभाग आणि जिल्हा प्रशासनाला पाठवण्यात आली आहे.



# आळंदीत हरिनाम गजरात विजया एकादशी साजरी

## भाविकांची श्रींचे दशनास गर्दी ; नदी घाटावर इंद्रायणी आरती

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आळंदी देवाची । इम्रान हकीम**

येथील माऊली मंदिरात विजया एकादशी दिनी पन्नास हजारावर भाविकांनी गर्दी करून श्रींचे दर्शन घेतले. श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या संजीवन समाधी मंदिरात नव्याने विकसित केलेली दर्शनबारी भाविकांचे गर्दीने फुलली. दर्शनबारीचे रांगेत हरीनाम गजर करीत भाविकांनी श्रींचे दर्शन घेतले. मंदिरात श्रींचा गाभारा लक्षवेधी पुष्प सजावट करीत सजविण्यात आला होता. इंद्रायणी नदी घाटावर आरती ग्रुप चे वतीने इंद्रायणी आरती हरिनाम गजरात झाली. परंपरेने विविध धार्मिक कार्यक्रम, श्रींचे पूजा, अभिषेख, आरती, कीर्तन सेवा नामजयघोषात झाली.

विजया एकादशी दिनी आलेल्या भाविकांनी मंदिर प्रदक्षिणा, ग्रामप्रदक्षिणा दिंडीतून उत्साहात केल्या. भाविकांना फराळ प्रसाद वाटप झाले. देहूकर यांचे वतीने मंदिरात मोरे महाराज यांची कीर्तन सेवा हृदय स्पर्शी सुश्राव्य सेवा रुजू झाली. परंपरेने एकादशी साजरी करण्यात आल्याचे मुख्य व्यवस्थापक माऊली वीर यांनी सांगितले. यावेळी श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमेटीचे प्रमुख विश्वस्त योगी निरंजन नाथसाहेब उपस्थित होते. संतोष महाराज मोझे यांचे वतीने हरी जागर भजन सेवा झाली. परंपरेने हरिपाठ आदी धार्मिक कार्यक्रम झाले. विजया एकादशी दिनी आळंदी मंदिर परिसरासह इंद्रायणी नदी घाटाचे दुतर्फा,प्रदक्षिणा मार्गावर प्रदक्षिणेस भाविकांनी गर्दी केली. परंपरेने मंदिरातील धार्मिक उपक्रम विधी, देवदर्शनास श्रींचा गाभारा खुला ठेवण्यात आला होता. कमी वेळेत जास्तीत जास्त भाविकांना दर्शनाची व्यवस्था करण्यात आली. यासाठी मंदिरातील सेवक, सुरक्षा रक्षक, बंदोबस्तावरील पोलीस यांनी काम पाहिले. आळंदी मंदीरात व्यवस्थापक माऊली वीर, उपव्यवस्थापक तुकाराम माने, सेवक, सुरक्षा रक्षक आदींनी नियोजन केले.



अलंकापुरीत एकादशी दिनी इंद्रायणी नदी घाटाची स्वच्छता ; इंद्रायणीची आरतीआळंदी ग्रामस्थ, इंद्रायणी आरती ग्रुप, राजमाता जिजाऊ महिला प्रतिष्ठान, आळंदी जनहित फाउंडेशन, महिला बचत गट सदस्य, पदाधिकारी, महिला मंडळ यांचे वतीने इंद्रायणी नदी घाटावर घाट स्वच्छता करीत इंद्रायणीची आरती हरिनाम गजरात झाली. एकादशी दिनी इंद्रायणी आरती करून नदी घाट स्वच्छता करीत सामाजिक बांधिलकी जोपासण्यात आली. एकादशी निमित्त इंद्रायणी आरती उत्साहात झाली. यावेळी भाविकांनी नदी घाटावर गर्दी करून आरतीस उपस्थिती दाखवली. प्रसाद वाटप उत्साहात झाले. यावेळी इंद्रायणी नदी स्वच्छता जनजागृतीचे सेवक माऊलींचे मानकरी गणपतराव कुऱ्हाडे पाटील यांचे निधना निमित्त आरती ग्रुप तर्फे श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

यावेळी राजमाता जिजाऊ महिला प्रतिष्ठान अध्यक्षा अनिता झुजम, आळंदी जनहित फाउंडेशनचे कार्याध्यक्ष अर्जुन मेदनकर, विश्वकर्म महाराज पांचाळ, सोमनाथ बेंडाले, गोविंद ठाकूर तौर, रोहिदास कदम, शैला तापकीर, राणी वाघ, अनिता शिंदे, संगीत शिंदे, शालन होनावळे, माजी नगरसेवीका उषा नरके, नीलम कुरधोंडकर, सुरेख कांबळे, शोभा कुलकर्णी, उषाबाई पाटील, सुशीला दीक्षित, पुष्पक लेंडघर, सावित्रा घुंडरे, रुख्मिणी परतूर, गंगाताई परतूर, कौसल्या देवरे, सुरेखा कुऱ्हाडे, सुनंदा चव्हाण, निर्मला आसुले, संध्या माहूरकर, सरस्वती भागवत विमल मुसळे आदीसह भाविक उपस्थित होते. इंद्रायणी आरती ग्रुपचे वतीने अनिता झुजम, संयोजक अर्जुन मेदनकर यांनी संयोजन केले. आळंदी इंद्रायणी नदी घाटाचे पावित्र्य जोपासण्यास मुख्याधिकारी कैलास केंद्रे यांना निवेदन देण्यास सर्व महिलांनी तसेच उपस्थितांनी संमती देत स्वाक्षऱ्या केल्या. राजमाता जिजाऊ महिला प्रतिष्ठान अध्यक्षा अनिता झुजम यांनी आळंदीचे मुख्याधिकारी कैलास केंद्रे यांची भेट घेऊन नदी परिसराचे वैभवात वाढ व्हावी. यासाठी उपाय योजना करण्याची मागणी करीत असल्याचे सांगितले. यावेळी उपस्थित मान्यवरांचे हस्ते प्रजासत्ताक दिनाचे पूर्व संध्येला इंद्रायणी नदी घाट स्वच्छता करीत सामाजिक बांधिलकी जोपासत इंद्रायणीची आरती झाली. पसायदानाने सामाजिक उपक्रमाची सांगता झाली. इंद्रायणी भक्त माऊलींचे मानकरी गणपतराव कुऱ्हाडे पाटील यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी त्यांचे कार्याचे आठवणी सांगत मनोगते व्यक्त झाली.



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश अध्यक्ष जयंतराव पाटील नांदेड विमानतळावर आले,असता त्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करताना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष ड अंगद केंद्रे उपस्थित होते.(छाया–लोकनेता न्यूज नेटवर्क कंधार )



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्रजी पवार पक्षाचे प्रदेश अध्यक्ष मा.श्री.जयंत पाटील साहेब यांच नांदेड विमानतळ अगमन झाल्याबद्दल स्वागत करताना मा.श्री भास्कर पाटील भिलवंडे जिल्हाकार्यध्यक्ष नांदेड यावेळी श्याम पाटील चोंडे,गजानन पाटील पवार,माधव कोरे उपस्थित होते.(लोकनेता न्युज नेटवर्क)



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्रजी पवार पक्षाचे प्रदेश अध्यक्ष मा.श्री. जयंत पाटील साहेब यांच नांदेड विमानतळ अगमन झाल्याबद्दल स्वागत करताना मा.श्री विक्रम भाऊ नागशेट्टीवार युवक राष्ट्रवादी जिल्हाकार्यध्यक्ष नांदेड, गजानन पाटील पवार तालुकाध्यक्ष नायगाव (लोकनेता न्युज नेटवर्क)



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्रजी पवार पक्षाचे प्रदेश अध्यक्ष मा.श्री. जयंत पाटील साहेब यांच नांदेड विमानतळ अगमन झाल्याबद्दल स्वागत विधानसभा कार्य अध्यक्ष सय्यद चॉद पाशा नरसीकर शाम चोंडे (लोकनेता न्युज नेटवर्क)

# विदर्भ जन आंदोलन चे जगदिश नरवाडे यांच्यासह अनेकांचा भाजपा मध्ये प्रवेश

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**महागाव । विजय थोरात**

विदर्भ जनआंदोलन आधार संघर्ष समितीचे संस्थापक अध्यक्ष जगदिश नरवाडे यांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला आहे.त्यांच्या पक्ष प्रवेशाने राजकीय समीकरण बदलणार असल्याचे संकेत राजकीय विश्लेषकांनी दिले आहे.



महागाव तालुक्यात अनेक गावांना पांदण रस्ते, शुद्ध पिण्याच्या पाण्याची समस्या,चांगल्या आरोग्य सुविधा मिळत नाही, तीस वर्षापासून शेतकऱ्यांच्या शेतात १० किमी ही धरणाचे पाणी गेले नाही वीज, घरकुल ,निराधार तालुक्यात वाढलेला भ्रष्टाचार निकृष्ट रस्ते, शेतकरी, शेत मजूर कामगार,अपंग नागरिकांना न्याय मिळवुन देण्या करिता अनेकवेळा आंदोलन रस्ता रोको केली तालुक्यातील जनतेला सत्तेत राहूनच न्याय मिळू शकते त्यामुळे तालुक्याच्या विकासासाठी जनआंदोलन आधार संघर्ष समितीचे संस्थापक अध्यक्ष जगदिश नरवाडे सुदामजी खंदारे विनोदराव शिंदे दलितानंद खडसे अमोल वानखेडे किसन पुंडे सुदाम देवडे किसन कदम संजय चव्हाण यांनी भाजपा जिल्हा समन्वयक नितीन भुतडा यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून दिनांक२२फेब्रुवारी शनिवार ला भाजपा प्रदेशाध्यक्ष ,महसूल मंत्री चंद्रकांत बावनकुळे व संजय भाऊ कुट्टे आमदार किसन राव वानखेडे माधवराव सुपारे भारतीय जनता पार्टी जिल्हाअध्यक्ष यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये भाजपामध्ये जाहीर प्रवेश घेतला आहे. महागाव तालुक्याच्या विकासासाठी सर्वसामान्य जनतेला न्याय देण्यासाठी हा पक्ष प्रवेश कामी लागणार आहे .नरवाडे यांच्या पक्ष प्रवेशाने तालुक्याचे राजकीय समीकरण बदलले जावुन येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये यांचा फायदा भाजपला नक्कीच होणार असल्याचे मत राजकीय विश्लेषक व्यक्त करीत आहेत.

# महाराष्ट्र शासन कृषी विज्ञान केंद्र नांदेड यांच्या तर्फे आर्या नैसर्गिक शेतीचे पुरस्कर्ते विश्वनाथ गोविंदराव पाटील होळगे यांचा सन्मान



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । गोविंद मोरे**

लोहा येथे दि.२४ कृषी विज्ञान केंद्र नांदेड यांच्यातर्फे आयोजित शेतकरी सन्मान समारंभ आयोजित करण्यात आला होता. त्या अनुषंगाने आर्या नैसर्गिक शेतीमधील विश्वनाथ यांची कार्य प्रशंसनीय ठरले. गेली दहा वर्षे आर्या नैसर्गिक शेती मध्ये दिलेले योगदान विषमुक्त अन्नाचा प्रसार व प्रचार मानवी आरोग्याची घेतलेली काळजी या बाबी विशेष लक्षणीय ठरल्या. विषमुक्त अन्न ही काळाची गरज सर्वांनी आता ओळखलेली आहे. विषमुक्त नैसर्गिक शेतीला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झालेले आहे .या सर्व बाबी लक्षात घेऊन कृषी विज्ञान केंद्र नांदेड यांच्या मार्फत आर्या नैसर्गिक शेतीचे पुरस्कर्ते विश्वनाथ गोविंदराव पाटील होळगे रा. दापशेड ता. लोहा जि. नांदेड यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी उपस्थित कृषी संचालक नांदेड दक्षिणचे श्री. मा. आमदार साहेब ,नांदेड जिल्हा कृषी अधीक्षक कळसाईत साहेब, वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख कृषी विज्ञान केंद्र मा. श्री .देवीकांत देशमुख साहेब ,अनेक अधिकारी वर्ग ,पत्रकार ,तथा कर्मचारी, पंचक्रोशीतील अनेक शेतकरी वर्ग यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होता.विश्वनाथ गोविंदराव पाटील होळगे.मो. नं. ९७ ६४ ०२५२०

# बेलेश्वर मंदिरात आज ह.भ.प.विष्णु महाराज लिंबोडीकर यांचे कीर्तन





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

साधु संतांच्या आशीर्वादाने आष्टी येथील सावता नगरातील बेलेश्वर मंदीरात दि.२३ फेब्रुवारी पासुन पंचदिनी अखंड हरिनाम सप्ताह व शिवलिला अमृत सोहळा सुरु झाला आहे.

या सप्ताहात दिप प्रज्वलन आष्टी तालुका वारकरी मंडळाचे तालुकाध्यक्ष ह.भ.प.दिनकरराव तांदळे,ग्यानदेव धोंडे,संपतराव धोंडे,विणापुजन बलभीम रंगनाथ धोंडे,हौसराव आजबे महाराज, ध्वजपुजन उद्योगपती आण्णासाहेब चौधरी,जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, पत्रकार अण्णासाहेब साबळे एन.टी.गर्जे,प्रा.मोहन धोंडे, प्रा.डॉ.बापुराव उर्फ सुर्यकांत धोंडे, ग्रंथपुजन डॉ.अजयदादा धोंडे,माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे,चेअरमन बाळासाहेब शिंदे यांच्या हस्ते झाले.या सप्ताहात काकडा भजन,विष्णु सहस्त्रनाम,शिवलिला अमृत ग्रंथपारायण, हरिपाठ,हरिकिर्तन होत आहे.सप्ताहात ह.भ.प.निवृत्ती महाराज बोडखे (आनंदवाडी), बालकीर्तनकार ह.भ.प. ज्ञानेश्वरीताई महाराज पौळ,ह.भ.प.श्रीहरि महाराज पुरी (आष्टी) यांचे कीर्तन झाले आज बुधवारी २६ फेब्रुवारी ह.भ.प.विष्णू महाराज लिंबोडीकर (रामगड संस्थान देविनिमगांव) यांचे रात्री ८ ते १० यावेळात कीर्तन होणर आहे.उद्या गुरूवार दि.२७ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १० ते १२ वा.या वेळात ह.भ.प.रामायणाचार्य गणेश महाराज कुदळे (चिंचोडी शिराळ) यांचे काल्याचे हरिकीर्तन होणार आहे.त्यानंतर बेलेश्वर मित्र मंडळ आष्टी यांची महाप्रसादाची पंगत होईल.

### माजी मुख्यमंत्री खा.अशोकराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली व एकनाथ दादा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली

# शेकापचे पुंडलिकराव पाटील बोरगावकर यांच्यासह अनेकांचा भाजपा मध्ये जाहीर प्रवेश

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा । विशाल घंटे**

राज्याचे माजी मुख्यमंत्री भाजपाचे नेते खा.आशोकराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली व एकनाथ दादा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली लोहा तालुक्यातील शेकापचे ज्येष्ठ कार्यकर्ते तथा बोरगाव आ.चे सरपंच प्र.पुंडलिकराव पाटील बोरगावकर यांच्यासह अनेकांनी भारतीय जनता पक्षामध्ये जाहीर प्रवेश केला आहे.



केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी व राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली भाजपा महायुतीचे सरकार अनेक कल्याणकारी योजना राबवित आहे तसेच नांदेड जिल्ह्यात भाजपा नेते माजी मुख्यमंत्री खा.अशोकराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्याचा चौफेर विकास होत असुन लोहा –कंधार मध्ये भाजपाचे नेते एकनाथ दादा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकी पुर्वी शेतकरी कामगार पक्षाचे जेष्ठ कार्यकर्ते तथा बोरगाव आ.चे सरपंच प्र.पुंडलिकराव पाटील बोरगावकर, दिलीप पाटील डांगे, सरपंच राम पाटील मुंरबीकर, बालाजी पाटील हिप्परगेकर, गोविंद डांगे , सुभाष ताटे, नवनाथ ताटे. , रमेश सुर्यवंशी, गोविंदराव डांगे आदींनी भारतीय जनता पार्टी मध्ये जाहीर प्रवेश केला असल्याची माहिती भाजपचे कार्यकर्ते योगेश पाटील नंदनवनकर यांनी दिली.

# शेत तिथे रस्ता गाव तिथे समृद्धी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मालेगाव । संदीप कदम**

उभ्या जगाचा पोशिंदा(बाप) शेतरस्त्यासाठी हळहळ करत असताना अर्ज बनवण्यापासून ते प्रशासकीय न्यायालयीन संघर्षामध्ये त्याच्या पिढ्या उद्ध्वस्त होत असताना त्याला न्याय देण्यासाठी शिव पानंद शेतरस्त्याची चळवळ शेतकऱ्यांच्या एकजुटीमधून निर्माण झाली तन मन धनाने निस्वार्थ सेवेतून तुटलेल्या समाजाला जोडण्याच काम चळवळीच्या माध्यमातून उभ होत असताना पुढच्या पिढीच्या उज्वल भविषयासाठी प्रेरणेसाठी राज्यभर शेत तिथे रस्ता गाव तिथे समृद्धी अभियान राबवत समाजहिताच कार्य पार पडत असताना कुठल्याही पदाचा किंवा स्वार्थाचा विचार न करता आपल्या पक्ष, संघटना, जात-पात धर्म याचे जोडे घरी ठेवून फक्त शेवटच्या शेतकरी भावाला दर्जेदार रस्ता मिळून देण्याचा संकल्प उराशी धरून कार्य करणाऱ्या शेतकरी पुत्रांना आज मोठ यश प्राप्त होत असुन आज आपण एका अंतिम टप्यात आहोत यामध्ये अनेक वर्षांचा संघर्ष आज संपणार असून समृद्ध शेतकऱ्यांच समृद्ध महाराष्ट्राच स्वप्न पूर्ण करण्यासाठी आपण इतक्या पिढया इतकी वर्ष घालवली आता फक्त सहा महिने आपल्या बापासाठी ,भावासाठी अर्पण करूयात जेणे एक विचार एक संघ आपला विजय नक्कीच आपल्या एकजुटीला कायम ठेवून आपल्या बापाच्या न्यायासाठी पुढच्या पिढीच्या उज्वल भविष्यासाठी स्वहिताचा विचार नकरता सामुहिकतेला बळकट करून शेतरस्ते खुले होतानाचे स्वप्न आपल्याला पूर्ण करायचे आहे.



## उमरीत युनिक फार्मर आयडीला सर्व्हरचा खोडा

# डिजिटल पद्धतीने केंद्र सरकारच्या योजना शेतकऱ्यांपर्यंत पोचविण्याचा उद्देश!

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी । महेश पडोळे**

केंद्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी ग्रीस्टँक योजनेअंतर्गत राज्य शासनाने नुकताच सर्व शेतकऱ्यांना युनिक फार्मर आयडी तयार करण्याचे आदेश दिले.परंतु,उमरीत सर्व्हर चालत नसल्याने शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.




ग्रीस्टॅक योजनेचा उद्देश हा सरकार राबवत असलेल्या योजना शेतकऱ्यांपर्यंत पोचविणे असा आहे. या योजनेची अंमलबजावणी संपूर्ण राज्यात करण्याचे राज्य सरकारने ठरवले आहे. या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभघेण्यासाठी शेतीसंलग्न माहिती संच तयार केला जाणार आहे. यामुळे शेतकऱ्यांची माहिती आणि आकडेवारी कळण्यास मदत होणार आहे. या योजनेची सुरवात झाली आहे.

केंद्र सरकार डिजिटल पद्धतीचा वापर करून शेतकऱ्यांपर्यंत योजना पोचविण्यासाठी सरकारने ग्रीस्टॅक योजना राबण्याचा निर्णय घेतला आहे. शेतकऱ्यांना त्याचा मोठा फायदा होणार आहे. शेतकऱ्यांना आपला फार्मर आयडी काढण्याचे आवाहन करण्यात येत आहे. दरम्यान, या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना पीककर्ज, पीएम किसान योजना आणि पीकविम्यासह सर्व सरकारी योजनांचा लाभ सहज मिळेल. यासाठी देशभरात शेतकरी नोंदणी कार्यक्रमाला गती देण्यात येत आहे. या कार्यक्रमात सातबारा संलग्न असलेल्या शेतकऱ्यांच्या नोंदी त्यांच्या आधारशी जोडल्या जाणार आहेत. याचा शेतकऱ्यांना खूप फायदा होईल; कारण त्यांना सरकारी योजनांसाठी पुन्हा पुन्हा केवायसी करण्याची गरज भासणार नाही. या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांना प्रथम नोंदणी करावी लागणार आहे.

> **योजना सोप्या पद्धतीने मिळाव्यात यासाठी शासनाने ग्रीस्टॅक योजनेअंतर्गत शेतकरी फार्मर आयडी योजना अंमलात आणली आहे. यातून शेतकऱ्यांना फायदा होईल. तसेच शेतकऱ्यांना लवकरात लवकर आयडी काढून घ्यावा.**

> **काही दिवसांपासून शेतकरी फार्मर आयडी तयार करण्यासाठी सीएससी केंद्रावर धाव घेताना दिसून येत आहेत. ग्रामीण भागात चांगल्या प्रकारे इंटरनेट सुविधा उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांना शारीरिक, मानसिक तसेच आर्थिक त्रास सहन करावा लागत असल्याच नागरिकांतून तीव्र संताप व्यक्त होत आहे.**

# मुखेड येथे राष्ट्रसंत गाडगे बाबा यांची १४९ वी जयंती उत्साहात साजरी



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुखेड । शिवकुमार बिरादार**

मुखेड, थोर समाज सुधारक राष्ट्रसंत गाडगे बाबा यांच्या १४९ व्या जयंती निमित्त मुखेड शहरातील धोबी गल्ली येथे महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.प्रथमता मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.यावेळी अनेक नागरिकांनी रक्तदान करून या सामाजिक कार्यात योगदान दिले. यावेळी डॉ अशोक कौरवार, डॉ. श्रीहरी बुडगेमवार डॉ राहुल कांबळे, डॉ रंजीत काळे, माजी नगरसेवक विनोद आडेपवार, माजी नगरसेवक राहुल आण्णा लोहबदे, माजी नगरसेवक चंद्रकांत गरुडकर, माजी नगरसेवक दिपक मुक्कावार, शिवसेना तालुकाप्रमुख बालाजी पाटील कबणुरकर, किशोरसिंह चौहान, आयुष सावकार पोलावार, अब्दुल सय्यद, बालाजी पाटील काटशेव, शंकर पिटलेवाड, हाणमत हाक्के, पत्रकार महेताब शे, रामदास पाटील, रियाज शेख, शिवशंकर पाटील कलबरकर, एफ एम सय्यद, साई भाऊ बोईनवाड, सचिन पाटील, नागेश गोविंदवाड, बाळु आण्णा आडगुलवाड, विश्वा गायकवाड , साई भांगे, गिरीधर पाटील, श्याम पाटील इंगोले, आशिष भारदे, गजु दादा लंगेवाड, नितीन टोकलवाड, जयप्रकाश कानगुले, प्रभाकर साधगीर, तसेच धोबी समाज बांधव मारोती विभुते, माधव होकर्णेकर, आनंद विभुते, शहाजी राखे, बालाजी मामीलवाड, शिवशंकर मुखेडकर, नागेश मामीलवाड, अजय ईबीतदा, साई डोंगरे, गजानन विभुते, प्रभाकर होकर्णेकर, संतोष ईबीतदार, नागेश डोंगरे कमळेवाडीकर, दत्ता मामीलवाड, मानीक डोंगरे, हाणमत मडलापुरे, नागेश डोंगरे, मोहन होकर्णेकर, निलेश मुंडकर, योगेश डाकळे लक्ष्मीकांत मुखेडकर, शुभम डोंगरे, हरीओम विभुते व सामाजिक कार्यकर्ते योगेश मामीलवाड उपस्थित होते. यावेळी सर्व पत्रकार बांधव व पोलीस कर्मचारी यांचीही उपस्थिती होती.

## लाच स्वीकारताना दलाल जाळ्यात

# तलाठी फरार, तीन हजारांच्या लाचेची मागणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पारध । रमेश जाधव**

तालुक्यातील पारध बू. येथील एका महिलेच्या जमिनीचा फेरफार करण्यासाठी पारध सजाचे तलाठी अभय मधुकरराव कुलकर्णी यांनी संबंधित महीले कडे तीन हजार रुपये लाचेची मागणी केली होती. मात्र सदर रक्कम देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाच लुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधून तक्रार केली होती.दरम्यान सोमवारी लाच लुचपत प्रतिबंधक विभागाचे छ. संभाजीनगर परिक्षेत्राचे पोलीस अधीक्षक संदीप आटोळे, अप्पर पोलीस अधीक्षक मुकुंद आघाव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक बी.एम. जाधवर, पोलीस अंमलदार भालचंद्र विनोरकर, गणेश चेके, अशोक राऊत यांनी सकाळी पारध तलाठी कार्यालयात सापळा रचून तडजोडी अंती ठरलेली लाच रक्कम रुपये दोन हजार ५०० रुपये स्विकारताना तलाठी कुलकर्णी यांचा खाजगी दलाल कृष्णा गणेश दळवी ( रा. येवता, ता. जाफराबाद) याच्या मार्फत स्विकारताना रंगेहाथ पकडले.पारध येथील तक्रारदार यांनी त्यांच्या आईने खरेदी केलेल्या जमिनीचा फेरफार करायचा म्हणून तलाठी कुलकर्णी यांच्याकडे विनंती केली. मात्र या कामासाठी तीन हजार रुपये द्यावे लागतील अशी लाचेची मागणी केली. तडजोडी अंती अडीच हजार रुपये देण्याचे ठरले ती लाचेची रक्कम स्विकारताना तलाठी कुलकर्णी यांनी ठेवलेला खाजगी दलाल कृष्णा दळवी यास लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने जाळ्यात ओढले

# शिवजयंती निमित्त सामान्य ज्ञान स्पर्धेचे आयोजन; स्पर्धेत एकूण २२१ विद्यार्थी सहभागी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकर । रमाकांत जोशी**



छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून राहुल कोंडलवार मित्र मंडळाच्या वतीने आयोजीत करण्यात आलेल्या सामान्य ज्ञान या स्पर्धा परीक्षेत पहिली ते नववी चे २२१ विद्यार्थी सहभागी झाले होते. छत्रपती शिवाजी महाराज त्यांच्या जयंती चे औचित्य साधत भोकर शहरातील रामन्ना नगर येथील काळा मारुती मंदिर समोर सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते ही परीक्षा दिनांक १८ फेब्रुवारी रोजी घेण्यात आली होती या स्पर्धा परीक्षेत इयत्ता पहिली ते चौथी पर्यंतच्या ७० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता तर इयत्ता पाचवी ते नववी पर्यंतच्या १५१ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.सदरील परीक्षा झाल्यानंतर दिनांक २२ फेब्रुवारी रोजी ईयत्ता पहिली ते चौथी प्रथम व द्वितीय बक्षीस व ईयत्ता पाचवी ते नववी प्रथम व द्वितीय बक्षीस अशाप्रकारे विजेत्यांना बक्षीस वितरण करण्यात आले ईयत्ता पहिली ते चौथी चे प्रथम बक्षीस आरुषी नरवाडे हिने मिळविले तर द्वितीय बक्षीस किशोरी पवनकर हिने मिळविले तर ईयत्ता पाचवी ते नववी प्रथम बक्षीस श्रद्धा संगेवार हिने मिळविले तर द्वितीय बक्षीस शैलेश पांचाळ याने मिळविले या स्पर्धेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देऊन गौरव करण्यात आला.सदरील कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कृष्णा पाटील कोंडलवार, सौरभ कुलथे, पवन दमकोंडवार, नागेश कदम, गणेश चिंताकुटे, अंकुश पांचाळ, वैभव वारकड, ज्ञानेश्वर चिंताकुटे, राजु चिंताकुटे, लव पांचाळ, तिरुमल लक्षटवार, नागेश वैध, ओम चिंताकुटे, साई लक्षटवार, वेदांत लक्षटवार, अर्जुन माळवंतकर, सौरभ वच्छेवार, विनायक सोनटक्के यासह श्री काळा मारुती मंदिर समिती भोकर यांनी कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडला .

# ग्रामीण रुग्णालय येथे राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम अंतर्गत संदर्भ सेवा शिबिर संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**



कंधार ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.किशोर कदम यांच्या मार्गदर्शनाखाली दि.२५ फेब्रुवारी रोज मंगळवारी सकाळी ठिक १०:३५ वाजता राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम अंतर्गत संदर्भ सेवा शिबिर घेण्यात आले. तालुक्यातील अंगणवाडीतील लाभार्थ्यांची ० ते ०६ वर्षे वयोगटातील लाभार्थी यांची तद्न डॉक्टरामार्फत आरोग्य तपासणी करून औषध उपचार देण्यात आले आरोग्य तपासणीस एकूण-६७ बालके उपस्थित होते.त्यामध्ये गंभीर आजाराचा -०१ व तीव्र-०३ कुपोषित बालकांना पोषण पुनर्वसन केंद्र (छठउ) स्त्री रुग्णालय नांदेड येथे संदर्भित करण्यात आले आणि मध्यम कोपोषीत-०७ बालकांना व सर्दी खोकला इतर आजारी असलेले एकूण- ५६ बालकांना ग्रामीण रुग्णालय कंधार येथे आरोग्य तपासणी करून औषध उपचार देण्यात आले. यावेळी उपस्थित वैद्यकीय अधिकारी डॉ.नागेश्री मारकवाड,डॉ.शाहीन बेगम,डॉ.उजमा,डॉ.नम्रता ढोणे,डॉ.गजानन,पवार, डॉ.अरुणकुमार राठोड,व कर्मचारी दिलीप कांबळे,शंकर चिवडे (औषध निर्माण अधिकारी), श्रीमती.सुरेखा मैलारे (परिचारिका) आणि ग्रामीण रुग्णालयातील सर्व वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते,

## दिव्यांगांच्या विविध मागण्यांसंदर्भात

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांना घेराव घालणार-राहुल साळवे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । किरण पाटील वडजे**





जिल्ह्यातील दिव्यांगांना स्थानिक स्वराज्य संस्था असो की नागरी स्वराज्य संस्था असो कि संजय गांधी निराधार अनुदान योजनेतील मानधन असो हे वेळेवर उपलब्ध होत नसल्याने तसेच आमदार खासदार निधी सुद्धा दिव्यांगांवर खर्च केला जात नसल्यामुळे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना हा घेराव घालण्यात येणार आहे, राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार हे दिनांक २८ फेब्रुवारी २०२५ रोजी नांदेड जिल्हा दौऱ्यावर येत असल्यामुळे त्यांना शेकडो दिव्यांगांसह घेराव घालणार असल्याचा इशारा बेरोजगार दिव्यांग कल्याणकृती संघर्ष समितीचे अध्यक्ष राहुल साळवे यांनी आज जिल्हाधिकाऱ्यांना एका निवेदनाद्वारे दिला आहे,या निवेदनात साळवे यांनी असे म्हटले आहे की, आमदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम अंतर्गतचा दिव्यांगांचा दरवर्षीचा राखीव निधी शासन निर्णय निर्गमित झाला तेंव्हापासून अद्याप खर्च करण्यात आला नाही, राज्याच्या अर्थसंकल्पात दिव्यांगांसाठी कुठलीच वाढिव निधीची तरतूद करण्यात येत नाही, संजय गांधी निराधार अनुदान योजनेतील मानधन वाढविणे तर दुरच जे आहे ते मानधन सुद्धा लाभार्थ्यांना वेळेवर मिळत नाही,डिपीडीसीच्या एकुण विकास निधीत दिव्यांगांसाठी १ टक्के राखीव निधी न ठेवता तो ५ टक्के राखीव निधी ठेवण्यात यावे यासह जिल्हा नियोजन समितीमध्ये दिव्यांगांना सदस्यत्व देण्यात यावे, उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी आपल्या आमदार स्थानिक क्षेत्र विकास निधीतून अद्याप दिव्यांगांवर निधी खर्चच केला नसल्यान्वये त्यांना शेकडो दिव्यांगांसह घेराव घालण्यात येणार असल्याचे बेरोजगार दिव्यांग कल्याणकृती संघर्ष समितीचे अध्यक्ष राहुल साळवे यांनी आज दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

# ग्रामविकास अधिकाऱ्याची राजकीय दबावाने झालेली बदली रद्द करण्याची मागणी

## अन्यथा उपसरपंचासह ग्रामपंचायत सदस्य व गावकऱ्यांचा उपोषणाचा इशारा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**हिमायतनगर। प्रभु कदम**

हिमायतनगर तालुक्यातील मौजे सरसम बुद्रुक हे गाव काही ना काही कारणाने तालुक्यामध्ये प्रकाश झोतात असते. या गावाला आधी लाभलेले ग्रामविकास अधिकारी भोगे यांनी गावाच्या विकासाकडे लक्ष न देता वारंवार गैरसहजर राहील्याने गावकऱ्यांनी त्यांच्याविषयी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यापर्यंत तक्रारी केल्या होत्या. पण आता राजकीय दबावापोटी त्याच ग्रामपंचायत अधिकाऱ्याची सरसम येथे बदली करण्यात आली आहे. सध्या कार्यरत असलेल्या ग्रामसेवकाबद्दल व कामविषयी कोणत्याही तक्रारी नसतानाही त्यांची बदली करण्यात आली आहे. यामुळे गावकरी बांधव,उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्यांनी थेट ग्रामविकास अधिकारी यांच्याकडे निवेदन देत राजकीय दबावातून झालेली ग्रामसेवक यांची बदली रद्द करा अन्यथा आमरण उपोषण करू असा इशारा दिला आहे.

सरसम ग्रामपंचायत चे सध्याचे ग्रामविकास अधिकारी श्री कोंडामंगल हे त्यांचा कारभार सुरळीत चालवत असताना अचानक श्री भोगे यांची सरसम येथे ग्रामविकास अधिकारी म्हणून बदली करण्यात आली. यापूर्वीही श्री भोगे यांनी सरसमचे ग्रामविकास अधिकारी म्हणून काम पाहिले आहे. पण गावाच्या विकासाकडे लक्ष न



देता वारंवार गैरहजर राहिल्याने गावकऱ्यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे तक्रारी करून त्यांना बदलण्यात आले होते. पण आता त्यांना सरसम येथे बदली देण्यात आल्यामुळे उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य व गावकऱ्यांनी थेट गटविकास अधिकारी यांना निवेदन देत भोगे यांना सरसम ग्रामपंचायतचा कारभार देऊ नये व ग्रामविकास अधिकारी श्री कोंडामंगल यांची बदली रद्द करा अन्यथा आमरण उपोषण करू असा इशारा उपसरपंच ऍड.अतुल वानखेडे, ग्रामपंचायत सदस्य नामदेव मोकासवाड, आम्रपाली कपिल कांबळे,अमोल कांबळे, ज्योती लालबा गायकवाड, पुष्पाबाई लक्ष्मण बिच्चेवार यांनी निवेदनाद्वारे दिला आहे. सरसम या गावांमध्ये राजकारणाचा पारा चढला असून निव्वळ राजकारण केले जात आहे अशी चर्चा सर्वत्र होत आहे.गावाच्या विकासाला मात्र कुठेही वाव दिसत नाही. यामुळे सरसममध्ये राजकारण जोमात आणि गावचा विकास मात्र कोमात अशी अवस्था पाहायला मिळत आहे.सरसम चे ग्रामविकास अधिकारी श्री कोंडामंगल यांची बदली करण्याचे कारण काय व कोणाच्या दबावाखाली बदली करण्यात आली ? की विकास कामाच्या निधीमध्ये टक्केवारी मिळत नसल्याने ही बदली राजकीय कुरघोडीतून करण्यात आली आहे का ? अश्या अनेक प्रश्नाची चर्चा गावामध्ये होत आहे.या बाबीकडे गटविकास अधिकारी कोणत्या दृष्टीने बघतील व काय ॲक्शन घेतील याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# कांजाळा येथे शिवजन्मोत्सव उत्सव सोहळ्यानिमित्त रक्तदान शिबीर व विद्यार्थ्यांसाठी भाषण स्पर्धा संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरा | शेख खमरूद्दीन जिलानी**



लोहा तालुक्यातील काजांळा येथे सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळा उत्सव समितीच्या वतीने दि.२१ फेब्रुवारी २०२५ शनिवार रोजी शिवजन्मोत्सव सोहळा उत्साहात साजरा करत, शालेय विद्यार्थ्यांच्या भाषण स्पर्धा व रक्तदान शिबीर व मिरवणूक आदी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यात ६५ जणांनी रक्तदान करत सामाजिक उपक्रमानी शिवजन्मोत्सव सोहळा साजरा करण्यात आला.

प्रारंभी श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण केल्या नंतर अभिवादन करण्यात आले. त्यानंतर शालेय मुलांच्या भाषण स्पर्धा व रक्तदान शिबिरास मोठा प्रतिसाद मिळाला, असून ६५ रक्तदात्यांनी रक्तदान केले आहे, शासकीय रक्तपेढीच्या कर्मचाऱ्यांनी रक्त संकलनात मदत केली. स्पर्धेतील विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. सायंकाळी श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या तैलचित्राची फुलांनी सजवलेल्या वाहनातून वाजत गाजत गावातील प्रमुख रस्त्याने मिवणूक काढण्यात आली. रात्री महाप्रसाद वाटपा नंतर कार्यक्रमाची सांगता झाली. यासाठी सार्वजनिक शिवजन्मोत्सव मंडळ व शिवगर्जना मित्र मंडळ समितीचे साईनाथ भागणारे, माधव भोंग , गणेश लोहकरे, तिरुपती मळगदे, नागेश भागानगरे, प्रताप मळगदे, देविदास लोहकरे, शिवानंद भोंग, माधव आढाव, रामेश्वर लोहकरे, विश्वनाथ भोंग, श्रीराम आढाव, किशोर आढाव तसेच सर्व धर्मातील शिवभक्त मिरवणुकीत मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# रानडुकराच्या हाल्यात रमेश शिंदेचा दुर्दैवी मृत्यू

## दोन दिवसापासून सुरु असलेली मृत्यूशी झुंज अखेर अयशस्वी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**शिराढोण | दौलत पांडागळे**

कंधार तालुक्यातील शिराढोण येथील युवक रमेश शिंदे हा दोन दिवसापूर्वी शेतातून चारा घेऊन येत असताना पाठीमागून येऊन अचानक जंगली रानडुकराने धडक मारून खाली पाडून पार अंग फाडून काढले होते प्रसंग एवढा भयानक होता की ऐकता क्षणी अंगावर शहारे यावे आणि पाहिल्यावर तर अक्षरशः माणूस निशब्द व्हावा.या अवस्थेत मागील



दोन दिवसापासून त्याच्यावर विष्णुपुरी येथील शासकीय दवाखान्यात उपचार सुरु होते शेवटी उपचारादरम्यान सोमवारी रात्री अकरा वाजता त्याचा मृत्यू झाला. हल्ला झाल्यापासून गावात हळहळ व्यक्त केली जात होती रमेश बरा होऊन घरी यावा यासाठी गावातील लोक प्रार्थना करून लागले पण शेवटी रमेश हरला आणि मृत्यू जिंकला. रमेशच्या मृत्यू ची बातमी गावात कळताच संपूर्ण गावावर शोककळा पसरली असून मंगळवारी दुपारी अतिशय शोकाकुल वातावरणात त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. सदरील घटना वनविभागाने गांभीर्याने घेऊन रमेशच्या कुटुंबीयास आर्थिक मदत शासनाकडून मिळवून दयावी आणि लवकरात लवकर वन्यप्राण्यांचा बंदोबस्त करावा अन्यथा अशा होणाऱ्या दुर्दैवी घटनेस वनविभाग सर्वस्वी जबाबदार असेल.रमेश शिंदे यांच्या पश्चात आई वडील, भाऊ, पत्नी, चार मुली, एक मुलगा असा परिवार आहे.

# शेतकऱ्यांनी आगरी टॅक्स फॉर्मर आयडी तयार करावे–शेतकरी नेते मारोती द गिते

■ लोकनेता न्यूज नेटवर्क


**सेनगाव | महादेव हरण**




हिंगोली जिल्हा राज्यातील शेतकऱ्यांना केंद्र व राज्य शासनाद्वारे राबविण्यात येत असलेल्या कृषी क्षेत्रात डिजिटल सेवा व शासनाचा विविध योजनांचा जलद गतीने परिणामाकरिता लाभ घेणे शेतकऱ्यांना सुलभ व्हावे याकरिता केंद्र शासनामार्फत आगरी टॅक्स फार्मर आयडी योजना राबविण्यात मान्यता देण्यात आली आहे तसेच हिंगोली जिल्ह्यातील काही शेतकऱ्यांनी आगरी टॅक्स फॉर्मर आयडी तयार करून घेतली परंतु आणखीन जिल्ह्यातील राहिलेल्या शेतकऱ्यांनी आगरी टॅक्स आयडी तयार करून घ्यावी असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते तथा शेतकरी नेते मारोती गिते रा सीनगी नागा जिल्हा हिंगोली यांनी केले आहे या योजना अंतर्गत शेतकरी खातेदार यांना फार्मर आयडी प्राप्त होणार आहे ज्या शेतकऱ्यांचा फार्मर आयडी तयार होणार आहे त्यांना शासनाकडून विविध योजनांचा लाभ जलद गतीने मिळणार आहे त्यामुळे शासनाचा आगरी टॅक्स योजनेअंतर्गत उर्वरित जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी फार्मर आयडी करण्याकरिता गावातील तलाठी महासेवा केंद्र ग्रामपंचायत संग्राम केंद्र सीएससी चालक यांच्याकडून नोंदणी करून घ्यावी जे शेतकरी फार्मर आयडी तयार करून घेत नाहीत तोपर्यंत शासनाचा कोणत्याही योजना लाभ त्यांना मिळणार नाही त्यामुळे या योजनेत नोंदणी करण्याकरिता केवळ आधार कार्ड व आधार कार्ड संलग्न मोबाईल क्रमांक आवश्यक आहे त्यामुळे शासनाचा विविध योजनेचा जलद गतीने शेतकऱ्यांनी लाभ मिळवण्यासाठी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी फार्मर आयडी तयार करून घ्यावे जेणेकरून शासनाच्या योजनेपासून कोणीही वंचित राहू नये या उद्देशाने असे आवाहन ग्रामपंचायत पुरस्कृत सामाजिक कार्यकर्ते तथा शेतकरी नेते मारोती गिते यांनी केले.

# नवीन मसलगा येथे अखंड दत्तनाम सप्ताह निमित्त यात्रा व जंगी कुस्त्याचा फड







■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुखेड | संदिप वडजे**

सर्व भाविक भक्तांना कळविण्यात आनंद होतो कि, प्रतिवर्षाप्रमाणे या हि वर्षी आमच्या नवीन मसलगा येथे श्री संत श्रेष्ठ महादगिर महाराज यांच्या संजिवन समाधी महोत्सव सोहळ्यानिमित्त अखंड दत्तनाम सप्ताह मि.मा. कृ. १२ शके १९४६ रोज मंगळवार दि. २५/०२/२०२५ ते दि.०४/०३/२०२५ रोज मंगळवार पर्यंत आयोजित केला आहे तसेच दि.०४/०३/२०२५ मंगळवार रोजी सार्वजनिक भंडारा राहील तसेच यात्रेनिमित्त दि.०५/०३/२०२५ रोज बुधवारी ठिक २.०० वाजता जंगी कुस्त्याचा फड आयोजित करण्यात आला आहे प्रथम बक्षिस ५५५५ रुपये, दुसरे बक्षीस २१२१,तिसरे बक्षीस ११११ रुपये ठेवण्यात आले आहे तरी वरील सर्व कार्यक्रमाचा अवश्य लाभ घ्यावा असे श्री रामगीर महाराज व समस्त गावकरी मंडळी नवीन मसलगा ता कंधार जि.नांदेड यांनी आवाहन केले आहे.

# घमॅट्रिक पूर्व शिष्यवृत्ती योजनेतील अखर्चित रकमांचा आढावा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड | बाजीराव पाटील गायकवाड**

इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे येथील संचालक यांच्या निर्देशानुसार आज इतर मागास बहुजन कल्याण संचालनालयाच्या उपसंचालक श्रीमती गाडेकर यांच्या अध्यक्षतेखाली इतर मागास बहुजन कल्याण येथे मॅट्रिक पूर्व शिष्यवृत्ती योजना सन २०२३–२४ यावर्षातील अखर्चित रक्कमांचा आढावा घेण्यात आला. शिल्लक असलेल्या रक्कमा जिल्हा समाज कल्याण अधिकारी नांदेड यांनी अर्ज मागणी करुन खर्च कराव्यात, असेही निर्देश त्यांनी यावेळी दिले.

तसेच २०२४–२५ मधील इतर मागास प्रवर्ग विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्तीचे प्रस्ताव हे संबंधित मुख्याध्यापक यांचेकडुन मागवुन गटशिक्षण अधिकारी यांनी त्यांच्या शिफारसीने तात्काळ सहाय्यक संचालक इतर मागास बहुजन कल्याण विभागाकडे शिफारशीसह सादर करण्याबाबत सूचित केले. या आढावा बैठकीमध्ये सन २०२३–२४ यावर्षातील प्राप्त तरतुद व झालेल्या खर्चाचा आढावा घेऊन शिल्लक असलेल्या रक्कमा खर्च करण्याबाबतही सुचित केले. त्यानुसार तांडावस्ती सुधार योजना, मोदी आवास योजना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना, यशवंतराव चव्हाण घरकुल योजना व इत्यादी योजनेचा आढावा घेण्यात आला. याबैठकीस इतर मागास बहुजन कल्याणचे सहायक संचालक शिवानंद मिनगीरे, जिल्हा समाज कल्याण अधिकारी सत्येंद्र आऊलवार, इतर मागास बहुजन कल्याण अधिकारी डी.एच.राजेमोड, सहायक लेखाधिकारी राहुल शेजुळ, शिक्षणविस्तार अधिकारी बस्वदे, शिक्षण अधिकारी (योजना) यांचे प्रतिनिधी शिंगडे, इतर मागास बहुजन कल्याण निरिक्षक आर.डी.सुर्यवंशी तसेच प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. या बैठकीत सर्व योजनेची तरतूद १५ दिवसात खर्च करण्याबाबत निर्देश देण्यात आले.



हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904